# M14/MAR512/EE/20160519

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

---

**सर्वसाधारण सूचना :**

1. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
2. प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3. प्रत्येक उप-प्रश्नांचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
4. 80 गुणांच्या प्रश्नपत्रिकेचे आपल्या शिक्षणक्रमाच्या संरचनेनुसार गुणांत रूपांतर करण्यात येईल.

---

1. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) जार्विस जॉर्ज यांनी ग्रंथांची भाषांतरे करणाऱ्यांस कोणत्या प्रकारे आवाहन केले होते ? 5

   b) 'दर्पण' या वर्तमानपत्राचे वेगळेपण स्पष्ट करा. 5

   c) 'विद्या हे बळ आहे' हे विधान थोडक्यात स्पष्ट करा. 5

   d) दादोबा पांडुरंग यांनी धंद्यातील उच्चनिच्चतेबद्दल कोणती मते व्यक्त केली आहेत ? 5

   e) लेखक रामकृष्ण विश्वनाथ यांनी हिंदुस्थान स्थितीबद्दल कोणते विचार व्यक्त केले आहेत ? 5

2. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) मराठी भाषेची स्थिती याबद्दल विष्णुशास्त्री चिपळूणकरांचे विचार स्पष्ट करा. 5

   b) राजकीय सुधारणांची आवश्यकता लो. टिळकांना विशेष महत्त्वाची का वाटते ? ते लिहा. 5

   c) पंडिता रमाबाईंनी विपत्तीत सापडलेल्या माणसाला कोणते मार्गदर्शन केले आहे ? 5

   d) 'स्त्रीपुरुष तुलना' या निबंधातील ताराबाई शिंदे यांचे विचार कितपत पटतात ते लिहा. 5

   e) मराठी भाषेच्या स्थितीबद्दल, लेखक राजाराम शास्त्री भागवत यांचे विचार स्पष्ट करा. 5

3. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

   a) 'देशव्यवहार व्यवस्था' या लेखातील ॲडम स्मिथ यांचे उद्योगाच्या वाटणीबद्दलचे विचार स्पष्ट करा. 5

   b) श्रमाच्या दोन प्रकारांचे स्पष्टीकरण कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या विचाराच्या आधारे करा. 5

   c) स्त्री विद्याभ्यासाबद्दल वृद्ध गृहस्थाने कोणते विरोधी विचार व्यक्त केले आहेत ? 5

   d) लेखक रा. भी. गुंजीकरांनी 'स्त्री तेजाचे' महत्त्व कसे स्पष्ट केले आहे ? 5

   e) गुजराथ्यांच्या महाराजांची दिनचर्या स्पष्ट करा. 5



http://www.ycmouonline.com

4. खालीलपैकी कोणतेही **चार** उप-प्रश्न सोडवा.

a) गो. ग. आगरकरांना धर्माचे वाटणारे महत्त्व लेखा आधारे स्पष्ट करा. 5

b) मराठी भाषेचा विस्तार कोणत्या प्रकारे करता येईल याबद्दल राजाराम शास्त्री यांचे विचार स्पष्ट करा. 5

c) मुंबईच्या बंदराचा सोयिस्करपणा प्रवाशांना कसा जाणवतो ते आचार्य व शिंगणे यांच्या लेखांच्या आधारे स्पष्ट करा. 5

d) महारांवर होणाऱ्या अन्यायाची दखल बाबा वलंगकर यांनी कोणत्या शब्दांत घेतली आहे ? 5

e) भाषांतरासारख्या मासिकाची आवश्यकता लेखक वि. का. राजवाडे यांच्या लेखाच्या आधारे स्पष्ट करा. 5

✦✦✦✦✦✦✦



http://www.ycmouonline.com